# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ३८५/२०२३ दिनांक – ०३/११/२०२३

## ३.९० लाख रुपये किंमतीचे गर्द (ब्राऊन शुगर) हा अंमली पदार्थ कब्जात बाळगणा-या आरोपीत यांना ताब्यात घेण्यात गुन्हे शाखा कक्ष -3 यांना यश

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री व तस्करी करणा-या इसमाविरुध्द कडक कारवाई करुन पायबंद करणे बाबत मा. वरिष्ठांकडुन सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गोपनीय बातमीदार याचे मार्फतीने बातमी मिळवुन दिनांक ०२/११/२०२३ रोजी २२.३५ वाजता विरार पुर्व, मनवेल पाडा, ९० फुट रोड चैतन्य हॉस्पीटल जवळील रोड येथुन आरोपीत नामे – १) अमिर जाकर खान वय ३५ वर्षे, रा. साईबाबा मंदीराच्या बाजुला, कातकरी पाडा, चंदनसार, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर याचे कब्जतुन २२ ग्रॅम वजनाचा फिक्कट तपकीरी रंगाची पावडर ही गर्दा (ब्राऊन शुगर) नावाचा अंमली पदार्थ व आरोपीत नामे - २) हरेश मनोज पटेल वय २९ वर्षे, रा. साईबाबा मंदीराच्या बाजुला, कातकरी पाडा, चंदनसार, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर याचे कब्जातुन १७ ग्रॅम वजनाचा फिक्कट तपकीरी रंगाची पावडर ही गर्दा (ब्राऊन शुगर) नावाचा अंमली पदार्थ असा एकुण ३, ९०, ०००/- रुपये किंमतीचा अंमली पदार्थ ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर आरोपीत विरुध्द विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १०३८/२०२३ एन.डी.पी.एस. कलम ८(क), २१(ब) प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास विरार पोलीस ठाणे करीता आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक / प्रमोद बडाख, पोउपनिरी/ अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा/ अशोक पाटील, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब/ गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.